
Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN : 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume -6 | Issue - 2 | March - 2016

# ‘संत गाडगेबाबा’ — एक कृतिशिल विचारवंत




डॉ. रीता पाठक
नबीरा महाविद्यालय , काटोल.

श्री. झिंगराजी राणोजी जानोरकर आणि सखुबाई झिंगराजी जानोरकर या दांपत्याच्या पोटी डेबूजीचा जन्म बुधवार दि.२३ फेब्रु. १८७६ (शके १८९७) रोजी अमरावती जिल्हयातील शेणगाव येथे झाला. शेणगावच्या पूर्वेस चिंचेच्या झाडाखाली ’मातामाय’ व पश्चिमेस ‘मरिमाय’ हीच गावाची ग्रामदैवते. मूल जन्माला आले की ग्रामदैवतासमोर दारूसह बकऱ्यांचे जेवण परीट समाजाला देणे ही त्या गावची प्रथा होती. या प्रथेतून झिंगराजीही सुटले नाहीत. डेबूच्या जन्माच्या आनंदाप्रित्यर्थ गावातील लोकांना कोंबड्या–बकऱ्यांचे दारूसह जेवण दिले. झिंगराजी दारूच्या व्यसनापायी आजारी पडले. आजूबाजूच्या नादाने ते देवकार्याच्या निमित्ताने अट्टल दारूडया बनले. दारूचे व्यसनातून झिंगराजी फुप्फुसाच्या रोगाने अंथरुणाला खिळले. घरदार, शेतीवाडी, गुरेढोरे सर्व गेले. दोन वेळेच्या जेवणाचीही पंचाईत झाली. औषधेही मिळाली नाहीत. भरभराटीच्या ऐन दिवसात झिंगराजीशेट म्हणून तोंडभर कौतुक करणारे आजारपणात मात्र दूर गेले. शेणगावच्या भुलेश्वरी नदीच्या पलीकडे कोतेगाव येथे त्याचे मावस भाऊ यादवजी आणि जयरामजी राहत होते. त्यांनी या पतित कुटुंबाला आपल्याकडे नेले. त्याच ठिकाणी झिंगराजीचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी झिंगराजीने पुढील उद्‌गार काढले. “सखू माहा कारभार अटपला ! मराले शेवटी मी लोकांच्या उंबरठयात ईऊन पळलो! मेल्यावर मळ जायाले पैसा लोकाचाच; कायनं आली असिल हे अवदसा? देवकाऱ्याच्या दारूनं ! काहाचे हे देव अन् काहाचे ते दगळा गोटयाईचे देवकारे? दारूच्या पाई घरदार, वावर, जमिन, मान मयरादयाले सोळल्यानं आपल्या संसाराधे कोयसे झाले. आता माहा आईक. आताच्या आता तो खंडोबा ती आसरा अन ते सर्वेच्या सर्वे देवपाटातले दगळ गोटे दे फेकून भुलेसरीत, आखीन एक काम. आपल्या लाळाच्या डेबुले वारा नोको लागू देऊ त्या देवदेवीचा, निर्मय राहू दे त्याले या देवदेवी अन् देवकाऱ्याच्या पापापासून. अरेरे काहाचे हे धरम अन्

कुयधरम? या खोटया देवाईले कोंबळे बकऱ्याईचे इनाकारण कापन्याच्या पापी फंदात मी पळलो नसतो त दारूच्या नादात कायते गोयलो असतो? लोकाईले का म्हुन बदलामी देवाव? माइया जोळ पैशाईचा आसरो होता तेथुरोक मले त्याहीनं दारूसाठी कोरलं. लोक असेच असतात सखू, पन त्याले या बकरेखाऊ अन दारू पिऊ देवाचा नाद लागू देऊ नोको बरं?"[१] हे झिंगराजीच्या तोंडचे उद्‌गार पुन्हा पुन्हा घेण्याचे कारण छोटया डेबूच्या समोर अतिशय हताशपणे काढलेले आहेत. तसेच डेबूच्या भविष्यकाळातील चळवळीची दिशा झिंगराजीच्या उद्‌गारांनी निश्चित केलेली आहे. झिंगराजीचा मृत्यू हा व्यसनांच्या आहारी गेल्यामुळे व देवांना बकरे कोंबडे कापण्यातून झाला. शेती, गुरेढोरे, मानमरातब सर्वकाही गेले. ही घटना डेबूच्या मनावर फार मोठा परिणाम करुन गेली. किंबहुना डेबू अशिक्षित असला तरी अंधश्रद्धेतून समाजात असे अनेक झिंगराजी आहेत त्यांना व्यसनापासून दूर केले पाहिजे असेही डेबूला वाटले असावे.

त्यानंतर आई सखुबाई आणि डेबू हे दोघेही मायलेक झिंगराजीच्या मृत्यूनंतर मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे मामाच्या गावी आले. तेथे चंद्रभान मामाची ६०–६५ एकर जमीन, मोठे घर, १०–१२ गुरेढोरे होती. झिंगराजीच्या मृत्यूची बातमी कळाल्यावर मामाने त्यांना आपल्या घरी आणले. तिथेच डेबूच्या क्रांतिगर्भ जीवनाची सुरुवात गुरेराखणीने झाली. शाळेत जाऊन शिक्षण घेण्याऐवजी डेबूचे शिक्षण गुरे राखण करण्याच्या कामातून सुरू झाले. अर्थात अनेक गुराखी मुलांना गोळा करुन भजने म्हणण्याचा कार्यक्रम सुरु झाला. वेगवेगळ्या जातीधर्माच्या लोकांना बोलावले जाऊ लागले. या प्रसंगी डेबू म्हणाला, "गडेहो आपुन त साराईच जेवतो खावतो. पन जरा भवताल पाहा ना? किती तरी अंधळे, लंगळे, रगतपिते, भिकारी मानसं आहेत. त्याहीले बिच्याऱ्याहीले चुकून तरी कधी नव्हाईची जेवारी बाजरीची भाकर पोटभर खायाले भेटत नाही. आज आपुन त्याहीले सगळ्याईल बलाउन आनून पोटभर जेव्याले घालू, अन्नदानासारखं महापुन्य नाही. ते आपले गरीब भाऊ अन् बहयनी जेवल्या म्हंजे तोच देवाले खरा नीवद होईल."[२] या डेबूच्या उद्‌गारावरुन जातीयतेची प्रथा मोडण्यास सुरुवात झाल्याचे दिसून येते. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यास डेबूने सुरुवात केली पुढे आयुष्यभर त्यांनी हेच कार्य केलेले दिसते.

चंद्रभानमामा डेबूच्या कामावर खूष होता. डेबूजीला त्याने गुराख्याऐवजी शेतातील कामामध्ये लक्ष देण्यास पाठवले. सन १८८२ ह्य साली कमलापूर येथील धनाजी खल्लारकर यांच्या कुंताबाई नावाच्या मुलीशी त्यांचा विवाह झाला. पुढे यथावकाश झिंगराजी ज्या वाटेने गेले त्याच वाटेने मामाची पावले पडायला लागली. दापुरे जवळील सांगवी दुर्गडे या गावचे सावकार बनाजी प्रिथमजी तिडके यांच्या सावकारीपाशाला मामा बळी पडला. चंद्रभानमामाचे वैभव संपुष्टात येऊ लागले. सावकाराने जमीन हडप करण्याचा प्रयत्न केला. येथेच सावकार व डेबूजी यांच्यात संघर्ष उडाला. सावकाराला हार पत्करावी लागली. पुढे संत गाडगेबाबांनी आयुष्यभर सावकाराकडून कर्जकादून सण, समारंभ, जत्रा करू नका, अंधश्रद्धेला बळी पडू नका हा विचार उभ्या महाराष्ट्राला दिला.

एक दिवस दि. २९ जानेवारी १९०५ साली डेबूजी सहकुटुंब ऋणमोचन येथे यात्रेस जातात. नदीमध्ये आंघोळीला गेल्यावर कमरेला असलेला चांदीछाप एक रुपया नदीमध्ये पडतो. अनेक बुड्या देऊनही हा रुपया सापडत नाही. या रुपयाप्रमाणे आपले जीवनही एक दिवस असेच संपून जाईल असे डेबूला वाटते. तो प्रसंग वसंत पोतदार आपल्या 'गाडगेबाबा' या चरित्रात रेखाटतात, "जसा तो रुपया तसाच हा देह. जसा तो पाण्यात गेला तसाच हाही प्रवाहात वाहून जाणार. अखेर हा देह म्हणजे काय एक वाळूची गिरणी."[3] असा विचार संत गाडगेबाबांच्या मनात सुरू झाला.

या घटनेचा डेबूच्या जीवनावर एवढा परिणाम झाला की बुधवार दि. १ फेब्रुवारी १९०५ रोजी पहाटे ३ वाजता मातोश्री सखुबाईचे दर्शन घेऊन डेबूजी घराबाहेर पडला. घराबाहेर पडताना एक फाटके धोतर, एक फुटके मडके, एक वेडीवाकडी काठी हातात घेऊन सर्वस्वाचा त्याग करुन घरदार सोडून निघून गेला. १९०५ ते १९१७ या १२ वर्षाच्या काळात डेबूजीने आपल्या देहाचा व मनाचा चोळामोळा करुन काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यावर विजय मिळविला. डेबूजीकडून त्यांचा प्रवास गाडगेबाबांकडे सुरू झाला. या १२ वर्षाच्या काळात अखंड भारतभ्रमण करून मिळेल तेथे काम करावे आणि खावे, गावे स्वच्छ करावी. रात्री कीर्तन करुन माणसांची मने स्वच्छ करावी हा त्यांचा कार्यक्रम होता. या काळात अनेक मान अपमान सहन करुन आपले कार्य त्यांनी अखंड सुरू ठेवले.

सन १९०५ सालापासून गृहसंसार–सुखाचा त्याग करुन ऋणमोचन या वऱ्हाडांतील पूर्णा काठच्या खेडयातून श्रीसंत गाडगेबाबांनी निष्काम कर्मयोगास सुरूवात केली. यात्रेकरुंसाठी भंडारे, घाट, मंदिरे उभारुन, एकतान्यांतील बोधामृताची अमृततुल्य भजने गाऊन गिरविण्यास सुरुवात केली. हिंदी समाजात शूद्र समजल्या जाणाऱ्या परटाच्या कुळांत आणि पट्टीचा दारूबाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, घरदार, संसार प्रपंचाची धुळधाण करुन कफनालाही महाग होऊन भणंग झालेल्या, झिंगलेल्या, झिंगराजीचे व सखूबाईच्या पोटी जन्म घेतलेल्या नंतर वैधव्याच्या व दारिद्रियाच्या खाईत पार होरपळून जाऊन निराश्रित बनून एका फाटक्या तुटक्या जीर्ण जुनेरांत गुंडाळलेल्या बाळ डेबूजीसह, तुकडयास मोताद होऊन दुःख, दारिद्रय आणि चिंतेचा डोंगर माथ्यावर घेऊन भयाण अवस्थेत भावाच्या घरी आश्रयास आलेल्या मातोश्री सखूबाईस आपला बाळ डेबूजी नजीकच्या भविष्यकाळात 'निष्काम कर्मयोगी लोकहितवादी हीन–दीन–दलितोद्धारक श्री संत गाडगे महाराज' होईल असे कधी वाटले नाही.

जनताजनार्दनाचे हे सेवेचे परमपवित्र व मंगलकार्य करीत असताना श्री बाबांनी उच्चनीच, गरीब, श्रीमंत, खालच्या व वरच्या जातीचा असा चुकूनही भेदभाव केला नाही. बहुजनांची भुके कंगालांची, महारोग्यांची, आंधळ्या पांगळ्यांची सेवा अहोरात्र बाबा करीत

राहिले. सर्वसमाजामध्ये एकोपा, एकरुपता व मातृभाव कसा निर्माण होईल या दिशेनेच ते सदासर्वकाळ वाट्यल करीत असत. श्री बाबांचे हे मानवतावादी व भूतदयेचे कार्य फारच प्रचंड अन् लाखमोलाचे आहे. उज्ज्वल मानवतावादी व भूतदयेचे कार्य करणारी थोर माणसे शतकामध्ये क्वचितच जन्मास येत असतात. "त्यांचे जीवन म्हणजे साधुत्व, कर्तृत्व आणि दातृत्व यांचा त्रिवेणी संगम असणारे होते."[४] असे बाळासाहेब भारदे यांनी म्हटलेले आहे. यावरुनही त्यांच्या कृतीशीलतेची आपणास कल्पना येते. बाबांनी फक्त उपदेश केला नाही तर स्वत: कार्य करुन दाखविले व नंतर समाजाला काम करण्यास प्रोत्साहित केले.

श्री. गाडगेबाबांचे समाजक्रांतीचे कार्य अमर आहे. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीतील नवसमाजनिर्मितीतील तसेच नवभारताच्या उभारणीतील श्री बाबांच्या या महान कार्याने त्यांना उच्चस्थान प्राप्त करुन दिले आहे. त्याची सर इतर कोणासही येणार नाही व दुसऱ्या कोणाशीही त्यांची तुलना करता येणार नाही. इतके हे अलौकिक व अतुलनीय प्रचंड कार्य बाबांनी केलेले आहे. बाबांनी १९०५ साली गृहत्याग केला आणि बाबांचे महानिर्वाण २० डिसेंबर १९५६ साली झाले. म्हणजे जवळपास पन्नास वर्षे समाजकार्य करीत, चंदनासारखा देह झिजवून अखेर अमरावती–चांदूर रस्त्यावर वलगाव जवळ चालत्या गाडीत आपला पार्थिव देह गुरुवार दिनांक २० डिसेंबर १९५६ रोजी रात्री १२ वाजून २० मिनिटांनी ठेवला. बाबांच्या कार्याचे मूल्यमापन श्री.वसंत पोतदार यांनी आपल्या 'गाडगेबाबा' या चरित्रात करताना म्हटले, "बाबांनी ज्या कंपनीत आजन्म नोकरी केली तिचं नाव होतं जीवन. पगार होता तळहातभर भाकर, खापरभर वरणाचं पाणी आणि गाडगंभर पिण्याचं पाणी ! पण हा समाजसेवक एक मृत्यूपत्र तयार करवून गेला त्या मृत्यूपत्राचा मजकूर असा, भुकेलेल्यांना जेवण द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, उघडयांना कपडे द्या, बेघरांना कपड़े दऱ्या, घर देऊ शकत नसाल तर तुमच्या ओसरीवर आसरा द्या, शिकतो म्हणेल त्याला शिक्षण द्या. रोग्याला औषध द्या, पशुपक्ष्यांना अभय द्या, बेकारांना काम द्या. तरुण, तरुणींना विवाहाची संधी द्या, निराशाला आशा द्या"[५] ही त्यांची मृत्यूपत्रीय अभिलाषा होती. या वरील निवेदनावरुन कृतिशिल विचारवंत गाडगेबाबा यापेक्षा वेगळे असूच शकत नाहीत. श्री संत गाडगे महाराजांनी 'श्री गाडगे महाराज मिशन'ची स्थापना इ.स. १९५२ मध्ये केली. या संस्थेचा नोंदणीक्रमांक पुढीलप्रमाणे : Certificate of Registration of Socieities] ACT XXI of 186] No- 2758 pg 1951-1952] (18 February 1952)"[६] असून या संस्थेची स्वत:च, स्वत:च्या अंतापर्यंत म्हणजे इ.स. १९५६ अखेरपर्यंत उत्तम प्रकारे जोपासना केली. सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा, शैक्षणिक सुधारण या तीन प्रभावी समाजक्रांतीच्या मार्गाने त्यांनी मिशनला अपूर्व यश संपादून दिले. संत गाडगेबाबांच्या कार्याचे मूल्यमापन आचार्य प्र.के. अत्रे यांनी 'मराठी माणसे मराठी मने' या लेखात पुढीलप्रमाणे केले आहे. "मार्क्स हा माणूस आहे की माकड आहे, हे देखील गाडगेबाबांना ठाऊक नाही. पण गेली ५० वर्षे आपल्या जीवनामधून आणि कीर्तनामधून गाडगे महाराज हे शुद्ध मार्क्सवादाचीच अज्ञ जनतेला शिकवणूक देत आलेले आहेत. गाडगेबाबा हे महाराष्ट्रातले समाजवादाचे एक प्रचंड व्यासपीठ आहे."[७] या शब्दात गाडगेबाबांच्या कार्याचा गौरव केला आहे तर 'गाडगेबाबांचे कीर्तन म्हणजे हजारो वर्षे समाजाच्या आर्थिक सत्तेखाली आणि धार्मिक रुढीखाली रडून निघाल्यामुळे दूधखुळ्या, देवभोळया अन् आंधळयापांगळ्या झालेल्या हीन–दीन समाजाच्या उद्धाराचा झगझगीत प्रकाशझोत असेही प्र.के.अत्रे यांनी म्हटलेले आहे. या सर्व विवेचनावरुन गाडगेबाबांची कृतिशिलता म्हणजे काय असते ते समजते.

## संदर्भग्रंथ सूची :–


१. के.सी. ठाकरे, 'लोकहितवादी दीनोद्धारक संत गाडगेबाबा', पृष्ठ क्र. 17
२. तत्रैव पृष्ठ क्र. 20
३. वसंत पोतदार, , 'गाडगेबाबा', पृष्ठ क्र. 25
४. द.ता. भोसले (प्रा.) – 'लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य', पृष्ठ क्र. 50
५. वसंत पोतदार, 'गाडगेबाबा', पृष्ठ क्र. 110
६. अच्युतराव गुलाबराव देशमुख – , 'श्री गाडगेबाबा मिशन', पृष्ठ क्र. उपलब्ध नाही
७. प्रल्हाद केशव अत्रे, 'मराठी माणसे मराठी मने', परचुरे प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पंधरावी, 2003, पृष्ठ क्र. 58.